सं. वाचनालय, ठाणें
विषय बा.वा.
दा. क्र. ९२४



# मी असा घडलों

सुधाकर प्रभु



किंमत साठ नये पैसे

११

IRBK-0108124
IRBK-0108124

गोष्टींचें गोकुळ

श्री : २९१ [ १–६२ ]

★

गोष्टींचें गोकुळ : ११

★

लेखक :

सुधाकर प्रभु

★

© १९६२
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रायव्हेट लि.

★

आवृत्ति पहिली : १९६२

★

किंमत ४० नये पैसे

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्राय. लि. करितां
३ राउंड बिल्डिंग
काळबादेवी रस्ता, मुंबई २

★

मुद्रक :
ज. श्री. टिळक
केसरी मुद्रणालय
५६८ नारायण पेठ
पुणें २

# ११. मी असा घडलों

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

गोकुळ म्हटलें म्हणजे त्यांत सर्व कांहीं आलें. गोपाळकृष्ण आला तसेंच त्याचे सवंगडी पण आले. खेळणें-बागडणें, गंमत-जंमत हें तर असणारच; पण त्याबरोबरच दोन शिकण्यासारख्या गोष्टीहि तिथें आढळणारच.

मुलांनीं खूप खेळावें, खूप खावें; तसेंच त्यांनीं खूप वाचावें, खूप ज्ञानहि मिळवावें असें आम्हांला वाटतें. वाचणें मनाच्या करमणुकीसाठीं तर आहेच; पण माहिती मिळविणें, ज्ञान मिळविणें हें वाचनानें साधावयाचें एक महत्त्वाचें काम आहे.

वाचनानें विद्या — विद्येनें शहाणपण — शहाणपणानें मोठेपण किंवा भलेपण. अशी ही शिडी आहे. त्या शिडीची वाचन ही पहिली पायरी.

खूप मुलांना खूप पुस्तकें वाचायला यावींत असें आम्हांला वाटत असतें. आम्ही त्यासाठीं आमच्या शक्तीप्रमाणें, आमच्या बुद्धीप्रमाणें प्रयत्न करीत असतों. आमच्या या प्रयत्नाचें चीज करणें तुमच्या हातीं आहे.

— प्रकाशक

दा.भा. ८९२४



# मी असा घडलों

एका मुलाचें आत्मवृत्त

८९२४
३३९९२
अनुक्रमांक
विभाग वा.वा.
क्रमांक २०६३
नों. दि.
१९।५।५

सुधाकर प्रभु

●

चाळीस नये पैसे

८९२४
वा.वा.
IRBK-0108124

वोरा अँण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २

श्री : २९१

©१९६०

वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

गोष्टींचं गोकुळ :
गोष्ट ११ वी

आवृत्ति पहिली :
शके १८८२
सन १९६०

चाळीस नये पैसे

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लि. प्रा. लि. करितां
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी, मुंबई २

मुद्रक :
ज. श्री. टिळक
केसरी मुद्रणालय,
५६८ नारायण पेठ,
पुणें २

# मी असा घडलों

गणपतीची मूर्ति तुम्ही पहातां. अगोदर केवळ शाडूची माती असते. तिला आकार देऊन त्यांतून हळू-हळू मूर्ति तयार होत जाते. मग त्या मूर्तीला वेगवेगळे रंग दिले जातात. आणि तुम्हांला जी सुंदर मूर्ति दिसते ती या खटपटीनंतर तयार होत असते.

तसेंच मारुतीच्या देवळांत जाऊन पहाल तर मारुतीची मूर्तीहि तुमचें मन आपल्याकडे ओढून घेते. त्या मूर्तीच्या पायावर तुम्ही डोकें ठेवतां. तिथें दोन फुलें वहातां. – पण ही मूर्ति कशी तयार झाली, आहे माहीत? साधा काळवत्री दगड होता प्रथम. दगड-फोड्यानें तो दगडाच्या खाणींतून फोडून बाहेर काढला. मग मूर्तिकाराच्या छिन्नीचे व हातोड्याचे घाव त्या दगडावर पडूं लागले. आणि असे अनेक घाव पडून पडून त्यांतून हळूहळू मूर्ति आकाराला येत गेली. अखेर सुंदर मूर्ति घडली. आणि मगच त्या मूर्तीला तुम्ही देव मानूं लागलांत. म्हणून म्हणच आहे कीं, ‘ टाकीचे घाव सोसावे तेव्हां देवपण अंगीं येतें. ’

माणसाचेंहि तसेंच आहे. तो शरिरानें आपोआप लहानाचा मोठा होत असतो. पण मनानें व बुद्धीनें मोठा होण्यासाठीं त्याच्यावर कित्येक क्रिया घडाव्या लागत असतात. त्यांनाच संस्कार असें म्हणतात. असे उत्तम संस्कार झाले म्हणजे उत्तम माणूस बनतो, असा सर्वसाधारण अनुभव आहे.

गरिबींतून, अडचणींतून लहानपण गेलेलीं अनेक माणसें असतात. पण त्यांतूनहि मनाचा मोठेपणा टिक-वितां येतो, स्वाभिमानानें जगतां येतें. आणि तोच माणूस पुढें मोठा झाल्यावर समाजांत मान्यता मिळवितो.

श्री. सुधाकर प्रभु यांनीं अशा एका मुलाचें हें चित्र मोठें आकर्षक रेखाटलें आहे.

९२८
३३११२
विभाग ...
२८६०३
१२/२/७४

# मी असा घडलों

अठरापगड जातींना घेऊन विसांवलेल्या गोमान्तकांतील एका छोट्या खेड्यांत माझा जन्म झाला. घर देखील छोटेंसें; पण मागें चार भाज्या देणारें छोटें परसूं आणि पुढें पूजेपुरतीं फुलें मिळवून देणारीं चार फुलझाडें. शिवाय दारासमोर आल्यागेल्याच्या स्वागताला उभ्या असलेल्या केळी. आमच्या आळींत शिरतांना सुरुवातीला आल्यागेल्याला आमचें घर लागायचें. घरासमोर कांहीं अंतरावर आमच्या वास्तुसीमेवरच एक शेवगा चवऱ्या ढाळायचा. पण तें झाड आमचें एकट्याचें नव्हतें. तें होतें साऱ्या आळीचें. साऱ्या गांवाचेंच म्हणाना. कोणी उदार आत्म्यानें रस्त्याकांठीं पडलेली फांदी उद्यांच्या पिढीसाठीं आमच्या दारांत पुरली. ती चांगली बहरली, फुलली. झाडाला लगडलेल्या शेंगा पाहून येणारा जाणारा हांकारून चार शेंगा तोडूं का विचारायचा. माझे वडील मग बाहेर येऊन त्याला शेंगा तोडून द्यायचे. गांवाला दुवा देत तो पांथस्थ शेवग्याची कीर्ति बरोबर घेऊन जायचा. त्याच्या आशीर्वादानें तो शेवगा परत फुलायचा.

✦ ✦ ✦

माझ्या घरांत सर्वांत वडील माणूस म्हणजे आजी. मला समजूं लागल्यापासून ती मला आठवतेय्. आजीला दिसत नव्हतें. आजी कांहीं जन्मापासून आंधळी नव्हती. कधींतरी म्हातारपणीं तिचे डोळे गेले. पण माझी म्हातारी आंधळी आजी चांगली डोळस होती. मी अभ्यास सोडून इतर उद्योग केलेले तिला पटकन् उमजायचे. आणि ती मग बसल्या जागेवरूनच म्हणायची, " विश्वनाथ, आतां पाटी घेऊन पाढे म्हणून दाखव बरं. "

आजीच्या शब्दांत मला असा धाक वाटायचा कीं, मी मुकाटपणीं पाटी घेऊन तिला पाढे म्हणून दाखवायचों. माझे वडील — आम्ही त्यांना बाबा म्हणत असूं — तेहि आजीच्या विचारानें वागायचे. प्रत्येक गोष्ट आई-बाबा आजीच्या सल्ल्यानें, तिचा होकार मिळवून करायचे. आजी आंधळी झाली होती, पण ती घराला जड वाटत नव्हती. माझी आई आंधळ्या झालेल्या आजीच्या संवयी, गरजा ओळखून वागायची. आजी माझ्या आईला आल्यागेल्यापुढें, तिच्या नकळत, नांवाजायची.

✣ ✦ ✦

माझी आई मला फार आवडायची. सकाळीं मी उठायच्या आंत तिनें दारासमोर सडा घालून रांगोळी घातलेली असायची. कधीं कधीं तुळशीवृंदावनासमोर रांगोळीच्या रेघा ओढतांनाच मी जागा होऊन ओटीवरून आईची रांगोळी बघत बसायचों. मी जागा झालों आहें हें माझी आजी ओळखायची. आंतूनच ती 'विश्वनाथ' म्हणून मला साद घालायची. मग मी पटकन आंत पळायचों.

घरांत मी एकुलता एक मुलगा. सारींजणें माझे लाड करायचीं. शाळेंत जाऊं लागण्यापूर्वीं मी सारा वेळ घरांत असायचों. सकाळीं तोंड धुतल्यावर बाबा गोठ्यांतील एकुलत्या एक गाईचें दूध काढीत असतांना "भांडं आण," "पाणी आणून दे," अशीं कामें सांगायचे नि मी तीं करायचों. त्यानंतर बाहेर बाबा विहिरीचें पाणी काढतांना कुठें तांब्या घेऊन झाडाला पाणी घाल, तर कुठें खालीं पडलेल्या जाई-जुईच्या सड्यांतून फुलें वेंच अशा उद्योगांत मी रमलेला असायचों. मध्येंच येऊन आजीच्या पाठीला मिठी पण घालायचों. क्षणभरच मला कुरवाळून आजी म्हणायची, "विश्वनाथ, बाळ, तुझ्या बाबांनीं लावलेल्या त्या जास्वंदीचं आळं जरा खुरपून घे बरं." मग मी बागेंत परत जायचों, तो मग बाहेरच रमायचों. बाबा मला विहिरीवर आंघोळ घालायचे. नंतर त्यांची देवपूजा मी पहात बसायचों. कधीं पूजेच्या वेळीं बाहेर असलों तर बाबा नेमके मला हांक मारायचे.

दुपारच्या वेळीं आई आणि आजी कांहींतरी निवडणें घेऊन बसायच्या. आजी अधिक वेळ बसायची नाहीं. आई हें काम करतांनां

मला पाटी देऊन जवळ बसवायची. माझ्या बाराखड्या आणि पावकीपर्यंतचे पाढे अशा दुपारच्या वेळींच आईनें करून घेतले. कधीं कधीं आई, आजी शिवण करायच्या. आई-आजींचीं लुगडीं, बाबांचें धोतर या वेळीं दुरुस्त व्हायचें. कधीं फाटकीं पातळें एक करून एका बाजूनें आई आणि एका बाजूनें आजी मिळून गोधडी शिवायला बसायच्या. आंधळी आजी गोधडीवर नजर ठेवून भराभर टाके घालतांना, मला सीतेला पळविणाऱ्या रावणाची आणि रावणाला मारणाऱ्या रामाची गोष्ट सांगायची. संध्याकाळीं बाबा घरीं आल्यावर या साऱ्या अभ्यासाची उजळणी व्हायची. तोंवर तव्यावरील तांदळाच्या भाकरीचा खरपूस वास नाकांत शिरायचा.

❖ ❖ ❖

माझे बाबा होते गांवच्या जन्ममृत्यु कचेरीचे एक कारकून. त्यांना त्या वेळीं सहा रुपये पगार मिळायचा. आमचें मोजक्या माणसांचें घर त्यावर कसेंबसें चालायचें. पण समाधानाची कळा माझ्या छोट्या घरावर सदा असायची. बाबा सकाळीं कामावर जायचे ते दुपारीं ११ ला जेवायला घरीं यायचे. अर्धाएक तास विश्रांति घेऊन ते परत कामावर जायचे. एकदां ते अवचितच घरीं आले. त्यांच्या हातांत पत्र होतें. प्रथम तें त्यांनीं आईला वाचून दाखविलें. आईनें डोळ्याला पदर लावला. बाबांनीं मग आजीलाहि तें वाचून दाखविलें. आजीच्या आंधळ्या डोळ्यांतून झरझरा अश्रूंचे सर वाहूं लागले. आई, आजी आणि बाबा बराच वेळ एकत्र बसून डोळे टिपीत होतीं भांबावलेला मी मध्येंच अंगणांत यायचों आणि परत माजघरांत येऊन त्या तिघांना पहायचों. त्या दिवशीं साऱ्या घरावर एक उदास अवकळा पसरली होती. नेहमींचें कोणतेंच काम कटाक्षानें आणि तत्पर-तेनें होत नव्हतें. कधीं नव्हती ती आजी आणि आई मला सारखें सारखें जवळ घेऊन बसायच्या. बाबा त्या दिवशीं बाहेरगांवीं गेले, ते दोन तीन दिवस परत आलेच नाहींत. बाबांना असे बाहेर राहिलेले मी प्रथमच पहात होतों. आजी आणि आई त्यांच्या येण्याची सारखी वाट पहात होत्या.

अखेर तिसऱ्या दिवशीं बाबा घरीं आले. त्या दिवशी त्यांच्याबरोबर माझ्याच वयाचा एक मुलगा होता. त्याचें नांव होतें अनंता. अनंता होता माझ्या आतेचा मुलगा. आतेला मी कधींच पाहिलें नव्हतें. आणि आतां आत्या मला कधीं दिसणारहि नव्हती. आत्या देवाघरीं गेली होती. आतेचा मुलगा अनंता आतां आमच्याच घरीं रहाणार होता. तो आल्यावर आजी धडपडत उठली आणि त्याला जवळ घेऊन रडूं लागली. मग मात्र मलाहि रडूं आलें. " आपल्या भाकरींत त्याची एक भाकरी. अंता मला जड नाहीं, " असें कांहींतरी बाबांनीं आजीला सांगितलें, इतकेंच मला आज आठवतें.

त्याच वर्षीं अनंता आणि मी शाळेंत जाऊं लागलों. गांवांतील आत्माराम शेटनीं चालविलेली शाळा जरा दूर होती. म्हणून एका खासगी मठांत आम्हीं शिकायला जाऊं लागलों. या मठाचा पुजारी दुपारच्या वेळीं मुलांना बाराखड्या आणि पाढे शिकवायचा. जवळची शाळा म्हणून लहान मुलें आपले पहिले धडे तिथें गिरवीत असत. या शाळेंत सारीं मुलें माझ्याच वयाचीं होतीं. मी आणि अनंता बाबांबरोबर या शाळेंत आलों.

पहिल्या दिवशीं या साऱ्या मुलांत मी बावरून गेलों. मला माझें नांवहि गुरुजींना नीट सांगतां येईना. कां कोणाला माहीत, त्या दिवशीं मला रडूंच फुटलें. गुरुजींनीं मला जवळ घेऊन समजाविलें, पण मला सारखी घरची आठवण होऊं लागली. माझे डोळे चोळून चोळून लाल झाले. मला गुरुजींनीं अनंताबरोबर घरीं पाठविलें. आईला माझें हें येणें आवडलें नाहीं. तिनें अनंताला व मला परत शाळेंत जायला सांगितलें. अनंता तयार झाला; पण मी रडूं लागलों. आईनें अनंताला आणि मला दोघांनाहि समजाविलें. अखेर अनंता जायला तयार झाला. मी मात्र आणखीनच रडूं लागलों.

आईनें अनंताला समजूत घालून परत शाळेंत पाठविलें; आणि आई तडक घरांत निघून गेली. मी रडत रडत तिथेच झोंपीं गेलों. संध्याकाळीं अनंतानें शाळेंतील साध्या साध्या गमती सांगितल्या. आईनें त्याची प्रेमानें विचारपूस केली. माझ्याशीं मात्र आई चकार शब्द बोलली नाहीं. आईचा अबोला माझ्या ध्यानांत आला आणि मला चुकल्या

चुकल्यासारखें वाटूं लागलें. संध्याकाळीं बाबा घरीं आले. त्यांनीं आल्या आल्याच मला जवळ घेऊन विचारलें, " आज काय शिकलास गुरुजीं-कडे ? " आतां मला माझ्या शाळा बुडविण्याचें वाईट वाटूं लागलें. रात्रीं जेवतांनाहि आई माझ्याशीं बोलली नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं लवकर उठून मी पाटीदप्तर घेऊन अनंताची वाट पहात उभा राहिलों. आईनें मला जवळ घेऊन माझा मुका घेतला. आम्हां दोघांच्याहि पाठीवरून हात फिरवून आईनें आम्हांला शेवग्याच्या झाडापाशीं निरोप दिला. मी परत कधींच शाळा बुडविली नाहीं.

देवळाला लागूनच असलेल्या धर्मशाळेंत गणा वाणी रहायचा. एका बाजूनें कांच लावलेल्या पत्र्याच्या डब्यांत भजीं घेऊन गांवच्या बाजारपेठेंत तो तीं विकायचा. दुपारीं तो धर्मशाळेंत भजीं तळायचा आणि त्याचा खमंग वास त्या वातावरणांत दरवळून रहायचा. पैशाला तेव्हां बारा भजीं मिळायचीं. कधीं कुणीं दिलेल्या पै-अर्ध्यापैशांतूनहि तीन भजीं मिळायचीं. भजीं घेणाऱ्या मुलाकडून त्या भजाचा तुकडा सर्वांना अणुअणु मिळायचा. आमच्या घरांत मात्र मुलांच्या हातीं पैसा कधीं मिळायचा नाहीं. वडिलांनीं मला एकदां नाण्यांची ओळख करून देतांना हातांत पैसे दिले होते तेवढेच ! एक दिवस माझ्या शर्टच्या गुंड्या काढण्यासाठीं फडताळ उघडलें आणि हातासरशींच मला एक ढबू पैसा सांपडला. पंचवीस भजीं मिळवून देण्याची शक्यता त्या ढबू पैशांत होती. शाळेंत येईपर्यंत अनंतालाहि मी त्या पैशाचा सुगावा लागूं दिला नाहीं. शाळेंत मी अनंताला तो ढबू पैसा दाखविला व त्याचीं भजीं घेणार म्हणून सांगितलें. एव्हांना मुलां-नाहि मी ढबू पैसा आणला आहे ही बातमी कळली. एकानें त्या बद-ल्यांत आपली नवी पेन्सिल देऊन भज्यांचा अर्धा वांटा मागितला. एकानें आपली अंकलिपि मला देऊं केली. एकानें आपली फूटपट्टी अर्ध्या पैशांत देऊन दीड पैसा परत करण्याचा वायदा केला.

मला भज्यांचा मोह मोहवूं लागला. पण या साऱ्या वस्तु घरीं नेल्या तर आईनें कटाक्षानें चौकशी केली असती. कारण मध्यें केव्हांतरी एकदां एका मुलाची चित्रांची वही त्याच्या नकळत मीं घरीं आणली होती. आईनें संध्याकाळीं माझें दप्तर तपासतांना ती

पाहिली आणि अनंताला माझ्याबरोबर देऊन त्याच संध्याकाळीं ती वही त्या मुलाकडे परत करणें मला भाग पाडलें. आईचा हा बाणा मला भिववीत होता. ते दोन पैसे खिशांत चुळबुळ करीत होतेच. आमच्या गुरुजींना आम्हीं दरमहा ठराविक फी अशी देत नव्हतों. कांहीं मुलें त्यांना शिधा देत, नारळ देत. मला काय वाटलें कुणास ठाऊक, मी खिशांतील तो ढबू पैसा नेऊन त्यांच्या हातीं दिला आणि " हे फीचे पैसे " म्हणून सांगितलें. त्यांनीं मला " हे कोणी दिले ? " असें खोदून विचारलें. मी गडबडलों आणि जाग्यावर येऊन बसलों. संध्याकाळीं गुरुजी घरीं येऊन आईला भेटले. त्या दिवसापासून आई गुरुजींना देण्याची आमची फी आमच्यापाशींच देऊं लागली. आम्हीहि ती न चुकतां गुरुजींकडे देऊं लागलों. त्या दिवशीं मला भजीं न घेतल्याबद्दल बऱ्याच मुलांनीं वेड्यांत काढलें. पण आईनें त्या दिवशीं मला जवळ घेऊन जी शाबासकी दिली तीमुळें मला त्याचें दुःख वाटलें नाहीं.

❖ ❖ ❖


दुसऱ्या वर्षापासून मात्र वडिलांनीं जरा लांब असलेल्या शाळेंत आमचीं नांवें घातलीं. या शाळेची इमारत मोठी प्रशस्त होती. गांवांतील सारीं मुलें तिथें शिकत होतीं. केवळ आमच्या एका आळीचेंच जग पाहिलेला मी शाळेंतील त्या दिवशींचें विश्व पाहून केवळ भांबावलों नाहीं तर आनंदूनहि गेलों. अनेक शिक्षक, अनेक विद्यार्थी मी तिथें प्रथमच पहात होतों. आपण या विश्वांत कसे सामावून जाऊं याचा विचार करीत असतांनाच एका मुलानें धक्का देऊन माझी टोपी उडविली. मला कमालीचें वाईट वाटलें. ती सांभाळून उचलून घेऊन आम्ही वर्गांत दाखल झालों. वर्गांत शिक्षकांनीं अनंताचें व माझें नांव विचारलें. आमची ओळख वर्गाला करून दिली. आमच्या आळींतीलहि बरींच मुलें मला या वर्गांत दिसलीं.

अभ्यासाला सुरुवात करण्यापूर्वीं मला काय येतें याची चौकशी गुरुजींनीं केली. माझ्या बाराखड्या आणि तीसपर्यंतचे पाढे झाले होते. मी गुरुजींना तसें सांगितलें. मुलांनींहि आश्चर्य व्यक्त केलें. अनंताचीहि माझ्याइतकी तयारी नव्हती. गुरुजींनीं मला बाराखड्या काढायला

सांगितल्या. मला हें काम सोपें वाटलें. मी भराभर साऱ्या बाराखड्या काढल्या. गुरुजींनीं पाटी पाहून कांहीं समाधान व्यक्त केलें नाहीं. त्यांनीं परत बाराखड्या काढायला सांगितल्या. मी परत बाराखड्या काढल्या. त्यांनीं परत मला तेंच काम दिलें. तिसऱ्या वेळेस मात्र मी रडवेला झालों. गुरुजींनीं मला बोलाविलें आणि पाटी पुसून आपल्या वळणदार अक्षरांत पाटीवर बाराखडी काढली. मग म्हणाले, "अक्षर असें सुटें, स्वच्छ आणि वळणदार काढावें. तुझी प्रगति छान आहे. पण ही बाराखडी आतां सावकाश काढून कशी छान दिसते पहा बरें !"

मी परत सावकाश अक्षरें काढून दाखविलीं. गुरुजींनीं या वेळीं मला शाबासकी दिली. त्या दिवशीं संध्याकाळीं मी अनंताला पुरी बाराखडी शिकविली. आणि मी माझ्या पाटीवर सावकाश आणि स्वच्छ बाराखडी काढली. मला प्रथमच माझें अक्षर सुंदर भासलें.

आमच्या वर्गांत पाटी पुसायसाठीं एका कळशींत पाणी ठेवलेलें असायचें. ही पाण्याची कळशी गुरुजींच्या मेजाखालीं असायची. एखादा धीट कमी उंचीचा मुलगा या कळशीवर दोन्ही पाय देऊन आपली पाटी मेजावर ठेवायचा. एकदां गुरुजी वर्गांत नसतांना मी त्या कळशीवर पाय



देऊन मुलांनीं ठेवलेल्या पाट्या मोजीत होतों. आमच्या वर्गांत अनंता-शिवाय अगदीं जवळचा मित्र मला अजून मिळाला नव्हता. पहिल्याच दिवशीं माझी टोपी उडविणारा मुलगा राघव माझ्याच वर्गांत होता. साऱ्याच मुलांत राघव दांडगा वाटायचा. आम्ही मुलें फारशीं त्याच्या वाऱ्यालाहि उभीं रहात नसूं. त्या दिवशीं मी कळशीवर पाय देऊन उभा असतांना राघवनें मागून येऊन कळशीवर लाथ मारली. कळशी पाया-खालून दूर झाली आणि मी अगदीं उताणा पडलों. सारीं मुलें हंसलीं. राघवहि हंसत माझ्यासमोर उभा होता. पण आज पडल्याचें मला वाईट वाटलें नाहीं. समोर उभ्या असलेल्या राघवच्या छाताडांत मी एक जोराचा गुद्दा ठेवून दिला. राघव मागच्या भिंतीवर जाऊन आदळला. मी मागेंपुढें न पहातां माझ्या जाग्यावर येऊन बसलों. संध्याकाळीं शाळा सुटेपर्यंत मी राघवकडे एकदांहि पाहिलें नाहीं. संध्याकाळीं शाळेच्या फाटकांत राघव उभा होता. माझ्याकडे पाहून तो हंसला मीहि हंसलों. राघव व मी मित्र झालों. पांचवीच्या परीक्षेपर्यंत तो व मी एका वर्गांत होतों — तो पहिला व मी दुसरा.

आम्ही त्या वर्षीं पहिली उत्तीर्ण करून दुसरींत गेलों. निकाल लागला आणि उन्हाळ्याची सुटी जाहीर झाली. मी, राघव, अनंता ओरडत ओरडत रस्त्यानें निघालों. आमच्या वर्गांतील मुलेंहि आमच्या-बरोबर ओरडत निघालीं. इतक्यांत शाळेचा शिपाई मागून आला व त्यानें मुख्याध्यापक आम्हांला बोलावीत आहेत असें सांगितलें. आम्ही घाबरत घाबरत शाळेंत परत गेलों. मुख्याध्यापकांसमोर आम्ही अजून कधींच गेलों नव्हतों. शाळेच्या आवारांत हिंडतांना त्यांना मी बऱ्याच वेळां पाहिलें होतें. आतां ते आमच्याकडे हंसत बघत उभे होते. आम्ही आल्यावर ते आम्हांला म्हणाले, “ तुम्ही कितवीचीं मुलें ? ”

आम्हीं आजच इयत्ता पहिली उत्तीर्ण केली होती. आम्हीं दुसऱ्या इयत्तेचे म्हणून त्यांना सांगितलें. मुख्याध्यापक मान हालवून म्हणाले, “ मला वाटतें, तुम्ही पहिल्या इयत्तेचीं मुलें आहांत. पहिल्या इयत्तेंतील मुलांसारखे तुम्ही आतां आरडत ओरडत जात होतां ! ”

मी म्हणालों, “ आमचीं नांवें आजच दुसरींत घातलींत. ”

33922
बालवाङ्मय




“ मग आजपासून तुम्ही मोठे झालांत. दुसरींतील मुलें अशीं दंगाधोपा करत रस्त्यांतून जात नाहींत ! ”

मुख्याध्यापकांनीं आम्हांला हंसत निरोप दिला.

उन्हाळ्याची सुट्टी आम्हांला फार वाईट गेली. अनंताची आई देवाघरीं गेल्याचें दुःख आजीला फार जाणवलें. ती मनांत झुरत होती. अनंताकडे बघून ती रडायची. आजीला असें रडतांना मीं पूर्वीं कधीं पाहिलें नव्हतें. तिचें जेवण कमी झालें होतें. एक दिवस सकाळीं, सर्वांअगोदर उठणारी माझी आजी उठलीच नाहीं. माझी आई येणाऱ्या-जाणाऱ्यांना म्हणूं लागली, “ आज मी पोरकी झालें ! ” दुपारच्या वेळीं निवडटिपण करतां करतां गोष्ट सांगणारी माझी आंधळी आजी मला अजून आठवते.

✦ ✦ ✦

इयत्ता दुसरीचें वर्ष संपलें आणि आम्ही तिसरींत गेलों. तिसरींत आम्हांला नवे गुरुजी आले. त्यांचें नांव सामंत. प्रार्थनेचीं गाणीं ते गोड आवाजांत म्हणायचे. आम्हांला ते मराठी शिकवायचे. मला मराठी विषय फार आवडायचा. राघव गणितांतलीं उदाहरणें भराभर सोडवायचा. मला गणिताचा कंटाळा यायचा. अडणारीं उदाहरणें मला राघव सोडवून द्यायचा. त्या दिवशीं सामंत गुरुजींनीं आम्हांला कविता शिकविली; आणि



म. श्री. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. ........ नों. दि. ..........
वि. .................. क्र. ..................

आमच्यांपैकीं कुणीतरी तीच कविता म्हणावी म्हणून सांगितलें. कोणीच कविता म्हणायला उठलें नाहीं. मी चुळबुळ करूं लागलों. माझी चुळबुळ गुरुजींनीं पाहिली आणि मला कविता म्हणायला सांगितलें. मी उठून कविता म्हणूं लागलों. माझा आवाज चढूं लागला. मी एक कडवें म्हणून थांबलों आणि गुरुजींकडे पाहिलें. त्याच्या मुद्रेवर समाधानाचें हंसूं होतें. त्यांनीं मला सगळी कविता म्हणायला सांगितली.

तेव्हांपासून मी पुस्तकांतील कविता गुणगुणूं लागलों. सामंत गुरुजींनीं मला अनेक कविता म्हणायला दिल्या. मुख्याध्यापकांकडेहि त्यांनीं एकदां सांगितलें, " विश्वनाथचा आवाज सुंदर आहे. " त्या वर्षीं शाळेच्या छोट्या संमेलनांत " मी होईन उद्यां शेतकरी " हें अभिनयगीत सामंत गुरुजींनीं माझ्याकडून म्हणवून घेतलें. पाहुणे म्हणून आलेल्या दिपोटींनीं मला जवळ बोलावून शाबासकी दिली. माझें अभिनयगीत बाबांनीं पाहिलें. पण आई शाळेंत आली नव्हती. आमच्यांपैकीं कुणाचीच आई तिथें आली नव्हती. मला वाटलें माझी आई इथे हजर हवी होती. बाबांनीं माझा अभिनय पाहिला होता. लगेच घरीं जाऊन त्यांनीं आईला माझा पराक्रम सांगितला. संध्याकाळीं मी घरीं गेलों तों आई दारांतच माझी वाट पहात उभी होती. तिनें दारांतूनच मला जवळ ओढून घेतलें. दिपोटींनीं माझी पाठ कशी थोपटली हें ती परत परत अनंताला विचारीत होती.

❖ ❖ ❖

इयत्ता चौथींत आमच्या वर्गांत सदाशिव आला. सदाशिव, कां कोणास ठाऊक, मला आवडत नसे. दुसऱ्याचा कोणताहि मोठेपणा तो सहानुभूतीनें मान्य करावयास तयार नसे. राघवनें एकदां त्याला मी कविता चांगल्या म्हणतों म्हणून सांगितलें. सदाशिव त्यावर म्हणाला, " उः ! त्यांत काय मोठेंसें ! मी पण म्हणेन. " सदाशिवचें हें उत्तर मला आवडलें नाहीं. सदाशिवहि अभ्यासांत हुशार होता. पहिल्या परीक्षेंत तो तिसरा आला. मी, राघव आणि सदाशिव असा आम्हां तिघांचा एक गटच झाला. आम्ही तिघेहि एकत्र अभ्यास करूं लागलों. सदाशिव मध्येंच असें कांहीं खोचक बोलायचा कीं मला त्याचा राग यायचा. एकदां आमची

शाळा पहायला आत्मारामशेट आले. ते आमच्या वर्गावर आले तेव्हां सामंत गुरुजी मराठीचा वर्ग घेत होते. मला गुरुजींनीं कविता म्हणायला सांगितली. मीं कविता म्हटली. आत्मारामशेटनीं खूष होऊन मला रुपया बक्षीस दिला. संध्याकाळीं तो रुपया मीं आईकडे दिला. चार दिवसांनीं बाबांनीं मला त्या रुपयाचें गोष्टींचें पुस्तक आणून दिलें. मी पुस्तक घेऊन शाळेंत गेलों. राघव-सदाशिवला मीं पुस्तक दाखविलें. सदाशिवनें तें घरीं नेण्याचा बूट काढला. आज आईला मी घरीं गोष्ट वाचून दाखविण्याचें वचन दिलें होतें. मीं गोष्ट वाचून दाखविली नसती तर ती रागावली असती. म्हणून मी दुसऱ्या दिवशीं सदाशिवला तें पुस्तक द्यावयाचें वचन दिलें. पण त्यानें राघवला यांत ओढलें. मग राघवनें माझ्यापाशीं तें पुस्तक घरीं नेण्यासाठीं मागितलें. पण मी राघवलाहि तेंच सांगितलें; उलट सदाशिवला दिलेला शब्द मीं राघवकडेहि राखला.

सदाशिवनें मात्र राघवला फितविलें. " मित्र म्हणतो आणि साधं पुस्तकहि एक दिवसासाठीं हा देत नाहीं ! " म्हणून राघवला त्यानें चिडविलें. राघव आणि मी अजूनपर्यंत कधींहि भांडलों नव्हतों. पण या प्रसंगानंतर राघवनें दुसऱ्या दिवसापासूनच माझ्याशीं अबोला धरला. दुसऱ्या दिवशीं मीं आणलेलें पुस्तकहि त्यानें घेतलें नाहीं. राघव घेत नाहीं तर मीहि घेत नाहीं, म्हणून सदाशिवनें राघवचा मान राखला. मला वाईट वाटलें. मला एकटा सोडून त्या दिवशीं दोघेहि सुटींत बाहेर पडले. सदाशिव आणि राघव दोघेहि बरोबर येऊं-जाऊं लागले. माझ्याशीं ते मनापासून बोलेनात.

मला आणखी एक वाईट वाटत होतें. गणित विषयांत मला राघवची फार मदत होई. आज राघवनें प्रथमच मला गणित सोडवून द्यायचें नाकारलें. मी राघवला कवितांचे अर्थ शिकवायचा; पण मला गणित विषयाचा वाटे तसा मराठीचा बाऊ राघवला वाटत नव्हता. सदाशिव आमच्या मैत्रींत आडवा येतो असें मला वाटत होतें. पण सदाशिवबद्दल राघवला वाईट सांगावें असें मला वाटेना. आमची सहामाही परीक्षा झाली आणि त्यांत सदाशिव पहिला, राघव दुसरा आणि मी तिसरा आलों. गुरूजींनीं निकाल वाचून दाखविला. राघवच्या आणि माझ्या

निकालाबद्दल त्यांनीं आश्चर्य व्यक्त केलें. मी रडवेला झालों. राघवकडे मीं पाहिलें. तो चांगला मुसमुसत रडत होता. शाळा सुटली. आज सदाशिव राघवची वाट पहात थांबला नाहीं. वर्गाच्या दारांत राघव आणि मी बऱ्याच दिवसांनीं भेटावें तसे भेटलों. दुसऱ्या दिवशीं राघव आणि मी बरोबर शाळेंत आलों. वार्षिक परीक्षेंत राघव पहिला, मी दुसरा आणि सदाशिव तिसरा आला!

आमच्या शाळेंत गणेशोत्सव साजरा व्हायचा. गांवांत घरोघर फक्त दीड दिवस गणपति असायचा. शाळेंत मात्र पांच दिवस पूजा चालायची. गणेशोत्सवांत अनेक कार्यक्रम व्हायचे. शाळेच्या कार्यक्रमांत आतां मला सामंत गुरुजी आग्रहानें घ्यायचे. या वर्षीं राघवनें जादूचा खेळ करून दाखविला. सुटींत त्याच्या मामाकडून तो हा खेळ शिकला होता. जादूचा खेळ करतां करतांच काय झालें कोण जाणे! एकदम तो रंगमंचावर ( स्टेजवर ) घेरी येऊन पडला. सारेजण घाबरले. मुख्याध्यापकांनीं त्वरा करून त्याला घरीं पोहोंचविलें. मी अजूनपर्यंत त्याच्या घरीं असा कधींच गेलों नव्हतों. पण आज प्रथमच मीं त्याच्या घरीं गेलों. राघव अजून बेशुद्धच होता; व त्याला तापहि चढत होता. माझा चेहरा अगदीं उतरून गेला होता. राघवच्या आईनें माझ्याकडे पाहिलें आणि विचारलें, " तूं विश्वनाथ का रे ? " मी " हो " म्हणालों. " राघव नेहमीं तुझ्याविषयीं सांगतो, " राघवच्या आईनें सांगितलें.

राघवचा ताप विषमज्वराचा ठरला. शेजारच्या गांवाहून डॉक्टर बोलाविले. डॉक्टरनीं काळजी घ्यायला सांगितलें. रात्र अंधारी होईपर्यंत मी राघवकडे बसून राह्यचों. सकाळ होतांच मी पुन्हां राघवकडे पळायचों. शाळेंतून परस्पर राघवकडे जायचों. राघव कधीं डोळे उघडतो असें मला झालें होतें. पण राघवनें कधींच डोळे उघडले नाहींत. राघव मला — आम्हांला सोडून गेला. मित्रवियोगाचें तें दु:ख मी कधींच विसरणार नाहीं.

*राघव गेला, आतां मला गणित विषय कोण समजावून देईल, सोपा करून सांगेल ? सदाशिव माझा मित्र होता आणि माझा प्रतिस्पर्धीहि होता. मी गणिताच्या खनपटीस बसलों. गणिताच्या गुरुजींना माझ्या अडचणी*

विचारूं लागलों. राघवचा गणित विषय आवडीचा होता. गणित विषयांत आवड निर्माण करून मी राघवचें स्मरण ठेवायचें ठरविलें. मी प्रयत्न करीत होतों. राघवची स्मृति ठेवून कामाला लागलों होतों. चौथींत मीच पहिला आलों. पहिला आल्याचा आनंद आज मला अणुमात्र झाला नाहीं. किंबहुना ज्या ज्या वेळीं पुढें मी पहिला आलों त्या त्या वेळीं राघवच्या स्मृतीनें व्याकुळ झालों आहें.

• • •

मी इयत्ता पांचवींत आलों. आणि पांचवी उत्तीर्ण करून सहावींतहि गेलों. अभ्यासाबरोबर आतां खेळांतहि मी रमत होतों. अनंता मात्र खेळांत अगदीं आघाडीवर होता. राघव गेल्यावर मी अनंतालाच धरून राहूं लागलों. अनंताचा हुतुतु खेळण्यांत हातखंडा. विरुद्ध पक्षाच्या हद्दींत जाऊन तो साऱ्या गड्यांना अंगावर घ्यायचा आणि त्यांच्या कोंडाळ्यांतून, जाळ्यांतून उडणाऱ्या माशांप्रमाणें टण्‌दिशीं उडी मारायचा. आपल्या हद्दींत येणाऱ्या गड्यानें त्याच्यापुढें हात करायचा अवकाश, अनंता उजव्या हाताची पकड त्याच्या हातावर ठेवून डाव्या हातानें त्याची तंगडी खसकन खेचून त्या गड्याला अंगावर ओढायचा. अनंताचा हा खेळ खरोखर मोठा आकर्षक असायचा. अनंता खेळत असतांना मी उत्साहानें आणि आनंदानें ओरडून त्याला प्रोत्साहन द्यायचों.

अनंता शाळेच्या हुतुतु संघाचा प्रमुख होता. अनंताच्या नेतृत्वाखालीं शाळेचा संघ शेजारच्या आंबेगांवीं सामन्यासाठींहि गेला. जाधव गुरुजी मार्गदर्शनासाठीं होते. मीहि मुख्याध्यापकांची आणि आई-बाबांची परवानगी मिळवून अनंताबरोबर त्या गांवीं गेलों. आंबेगांवचा संघहि तयार होता. दोन्ही संघ एकमेकांना साजेसे होते. दोघांत कमालीची चुरस होती. आमच्या अनंताप्रमाणेंच त्यांच्या बाजूचा मुकुंद हा फार सुरेख खेळायचा. त्यांचे गडी एकमेकांना सांवरून घेऊन खेळत होते. आमच्या बाजूला अनंता सोडला तर तसा तडफेचा दुसरा गडी नव्हता. आणि त्याहून विशेष म्हणजे साऱ्यांची जूट नव्हती. विरुद्ध पक्ष मात्र एकजुटीनें खेळायचा. त्यांचा खेळ आकर्षक नसतांनाहि विजयाचें पारडें त्यांच्याकडे झुकत होतें. अनंताचा वैयक्तिक खेळ मात्र इतका सुंदर साधला कीं विरुद्ध

बाजूचे गडीहि त्याची सुरकांडी पाहून त्याचें कौतुक करायचे. अखेर आंबेगांवच्या संघानें स्पर्धा जिंकली. पण वैयक्तिक खेळाचें पदक मात्र अनंताला देण्यांत आलें. तरीपण अनंताला त्या पदकाचा आनंद वाटला नाहीं. शाळा हरल्याचें दुःखच त्याला अधिक झालें. अनंताच्या त्या वैयक्तिक विजयानें माझी छाती मात्र फुगून गेली.

● ● ●

त्या आनंदांतच घरीं आलों. घरीं मात्र केवढें दुःखाचें ताट वाट पहात होतें ! वडिलांना हृदयविकाराचा झटका आला होता. घरच्या वाढत्या खर्चासाठीं माझे बाबा अतोनात श्रमत होते. सरकारी नोकरीचें काम आटोपल्यावर ते भय्याशेटच्या दुकानावर हिशोब लिहायचें काम करीत. बाबा असे घाम गाळीत होते तें मला दिसत होतें. मी मात्र कधीं बाबांकडे कांहीं आणून देण्याबद्दल हट्ट केला नाहीं. पण तरीहि मुलाचें कोड पुरविण्यांत बाबांनीं हात आंखडता घेतला नाहीं. मी अभ्यासांत हुशार आहें हें कळल्यापासून माझ्या पोटांत चार सात्त्विक अन्नाचे घांस जावे म्हणून ते धडपडायचे. अनंता आमच्या घरीं रहावयास आल्यावर त्याच्या पोटापाण्याची, कपड्या-लत्त्याची जबाबदारी त्यांच्यावरच पडली. माझ्या बरोबरीनेंच त्यांनीं अनंताचे लाड केले. माझ्या बाबांना विडी-काडीचेंहि व्यसन नव्हतें. व्यसन होतें तें श्रमाचें ! घरीं आल्यावराहि बागेंत काम कर, कुठें परसाचें कुंपण नीट कर, असे त्यांचे उद्योग चालायचे.

मला समजूं लागल्यापासुन बाबा कधीं डोकें दुखतें, पाय दुखतात म्हणून विव्हळलेले पाहिले नाहींत. दमून भागून आलेल्या बाबांचे पाय चेपावे असें मला वाटे. पण लहान मुलाकडून अशी सेवा घेणें बाबांना मुळींच आवडायचें नाहीं. दोन वर्षांपूर्वीं असाच एक सौम्य झटका बाबांना आला होता. ओळखीच्यांनीं बाबांना काम कमी करायचा आणि विश्रांति घ्यायचा सल्ला दिला. बाबा त्यावर नुसते हंसले. आणि बरे झाल्यावर हिरीरीनें पुन्हां कामाला लागले. बाबांच्या अविश्रांत श्रमाला आतां कायमची विश्रांति मिळाली. बाबा मला, आईला, अनंताला सोडून

33992 आ.व.न. २००३ १२४४

गेले. घरचा आधार गेला. अनंताचे वडील येऊन अनंताला गांवीं घेऊन गेले.

माझें हें सातवीचें आणि शाळेंतलें अखेरचें वर्ष होतें. मी खूप शिकावें अशी बाबांची इच्छा होती. पण घर चालविण्यासाठीं मलाहि कांहीं तरी करायला हवें होतें. माझा गांव उदार होता. एका विधवेला आणि तिच्या पोराला पोसायला समर्थ होता. पण आईला हें फुकटचें धर्माचें खाणें नको होतें. "तुझ्या वडिलांनीं कधीं फुकटचं खाल्लं नाहीं," असें ती म्हणाली. मलाहि हें पटलें. भय्याशेट दुकानावर मला काम द्यायला तयार होते. माझी हुषारी त्यांच्या कानावर गेली होती. पण मी इतक्यांत नोकरी करावी अशी आईची इच्छा नव्हती. मी केवळ सातवीच नव्हे तर अजून पुढें शिकावें असें तिचें म्हणणें. "माझ्या कुडींत अजून गाडाभर काम उपसायची शक्ति आहे. पुढें वेळ आली तर पदरचे दोन दागिनेहि काम देतील," असें सांगून तिनें मला शाळेंत पाठविलें. वडिलांना जाऊन महिना झाला आणि तिनें गांवचीं कामें घरीं आणायला सुरुवात केली. वडिलांचा वियोग मला फार जाणवूं लागला. शाळेंतून आल्यावर मी वडिलांची वाट पहात राही. संवयच लागली होती ती मला. पण आतां कोणाची वाट पहायची मी? माझी ही स्थिति आईच्या लक्षांत येई. पण ती स्वतः दुःखानें होरपळलेली. कोणी कोणाला दिलासा द्यावा? माझ्या पोरकेपणाचें दुःख सामंत गुरुजींनीं ओळखलें. ते मला वेळोवेळीं घरीं बोलवूं लागले. कांहीं वाचायला देऊं लागले. मी हळूहळू दुःख विसरूं लागलों. अभ्यासांत रमूं लागलों. खूप शिकायची ईर्षा धरून झटून अभ्यासाला लागलों.

इकडे आई माझ्यासाठीं श्रमत होती. गांवाचा सद्भाव आम्हांला लाभला होता. कोणी कांहीं माझ्यासाठीं म्हणून आईला देऊं करायचे; पण आईनें ही सर्वांची मदत निग्रहानें नाकारली. लोकांना न दुखवितां, न तोडतां नाकारली. आईला असें काम करतांना पाहून मला कांहीं तरीच वाटायचें, हृदयांत कुठेंतरी गलबलायचें. हातांतील पुस्तक खालीं ठेवून मी आईकडे यायचों. आई माझें मन ओळखून मला म्हणायची,

" तुला कंटाळा आला असला तर मला कांहीं तरी वाचून दाखव. " माझी प्रेमळ आणि हितकर्ती आई मला अशी वाढवीत होती.

• • •

सातवीची पूर्वपरीक्षा झाली. शेवटचा दीड महिना राहिला आणि मी झपाट्यानें अभ्यासाला लागलों. सदाशिवला आतांपर्यंत पहिला नंबर मी कधींच मिळूं दिला नव्हता. आतां या परीक्षेंतहि सदाशिवच्या वरतींच क्रमांक ठेवायचा, राघवचें स्मरण ठेवण्यासाठीं मला हें केलेंच पाहिजे, या धडपडीनें मी अभ्यासाला लागलों.

सातवीच्या मुलकी परीक्षेसाठीं मी गांवाहून मालवणला आलों. गोमन्तकांत या परीक्षेचें केंद्र नव्हतें. माझ्या उत्तरपत्रिका ( पेपर्स ) उत्तम गेल्या. यशाची खात्री कधींचीच होती. फक्त परीक्षा आटोपली, आतां पुढें काय हा प्रश्न होता. आईची इच्छा मी अधिक शिकावें अशी होती. पण आईला कष्टवून मीं विद्या किती दिवस प्राप्त करायची ? किती दिवस शिकत रहायचें ? असे नाना प्रश्न माझ्यापुढें येत होते.

परीक्षा आटोपली त्याच दिवशीं परीक्षा-मंडपांत शिक्षणाधिकाऱ्यांचें व्याख्यान होतें. रत्नागिरीला सरकारतर्फे उद्योगशाळा काढण्यांत आली होती. केवळ कारकुनी करण्यापेक्षां उद्यांच्या पिढीनें उद्योगधंद्यांत पुढें यावें या हेतूनें ही उद्योगशाळा सुरू केलेली होती. इयत्ता सातवीच्या मुलकी परीक्षेस बसलेल्या हजारों विद्यार्थ्यांपुढें पुढें काय करणार, हा प्रश्न ठेवून शिक्षणाधिकारी म्हणाले, " पुढें एकाद्या दुकानीं कारकुनी करण्यापेक्षां हा वर्ष सहा महिन्यांचा अभ्यासक्रम तुम्हांला पुरा करतां येण्यासारखा आहे. गरीब होतकरू मुलांना या अभ्यासकालांत सरकारतर्फे शिष्यवृत्तिहि मिळेल. जे आज या अभ्यासक्रमासाठीं नांव देतील आणि उद्यां माझ्याबरोबर त्या विद्यालयांत येण्यासाठीं निघतील त्यांना माझ्या खर्चानें मी रत्नागिरीला घेऊन जाईन. " मी क्षणाचाहि विलंब न लावतां माझें नांव शिक्षणाधिकाऱ्यांकडे दिलें.

संध्याकाळीं मी सागरकिनाऱ्यावर येऊन बसलों. समोर सिंधुदुर्गाची पुसट आकृति दिसत होती. समुद्राच्या लाटा किनाऱ्यावर येऊन फटाफट फुटत होत्या. विरणाऱ्या त्या फेसाळ लाटांत मला दारचा शेवगा

दिसत होता. कष्टणारी आई दिसत होती. " फुकटचें खाऊं नये, " म्हणून सांगणारी आई दिसत होती. मृत्युशय्येवरील राघव दिसत होता. अविश्रांत काम करणारे वडील दिसत होते. आणि हें सारें आठवून मीं केलें तें बरोबर कीं चूक याचा विचार करीत होतों. आईचा विचार घेऊनच मी आतांपर्यंतची वाटचाल केली होती. आज मात्र प्रथमच माझा मीच निर्णय घेत होतों. अवघ्या वर्षा सव्वावर्षांत माझा अभ्यासक्रम पुरा होणार होता. माझा मींच निर्णय घेतला. आईला सविस्तर हकीगतीचें पत्र लिहून मीं तिचा आशीर्वाद मागितला. पत्र टपालपेटींत टाकलें. आणि हातांत पिशवी घेऊन शिक्षणाधिकाऱ्यांच्या तळावर हजर झालों. माझा मींच घेतलेला निर्णय मला योग्य वाटत होता. मी आज मोठा झालों होतों.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ... नों. दि ...
वि. ... बा. वा. क्र. ...
ग्रंथ संग्रहालय ठाणे
अनुक्रम 33992
विभाग
क्रमांक 2963
नों. दि.
वाचनालय शाखा



# संस्कृत साहित्य सरिता

*स्मरणीय सुभाषितांसह दुसरी आवृत्ति प्रसिद्ध झाली.*

**संस्कृत भाषेंतील प्रसिद्ध काव्य-नाटकांचें मराठी सुबोध कथासार : ३२ पुस्तकांची पेटी**

१. रघुवंश
२. शाकुन्तल
३. विक्रमोर्वशीय
४. मृच्छकटिक
५. प्रतिमा
६. महावीरचरित
७. उत्तररामचरित
८. मालतीमाधव
९. स्वप्नवासवदत्ता
१०. दशकुमारचरित : १
११. दशकुमारचरित : २
१२. वेणीसंहार
१३. कुमारसम्भव
१४. मालविकाग्निमित्र
१५. हर्षचरित
१६. नागानन्द
१७. पंचरात्र
१८. रत्नावलि
१९. कादम्बरी
२०. मेघदूत
२१. शिशुपालवध
२२. किरातार्जुनीय
२३. बुद्धचरित
२४. मुद्राराक्षस
२५. प्रतिज्ञायौगंधरायण
२६. अविमारक
२७. अभिषेक
२८. मध्यमव्यायोग
२९. कर्णभार
३०. ऊरुभङ्ग
३१. पार्वतीपरिणय
३२. नलोदय-नैषध

*विद्यार्थी, नवशिक्षित, अल्पशिक्षित व सामान्य वाचकवर्ग यांसाठीं*

३२ पानांचें एक पुस्तक : प्रत्येकीं ३७ नये पैसे. पुठ्ठयाच्या मजबूत पेटींतून विविध रंगी बत्तीस पुस्तकें एकत्र : १२ रुपये फक्त.


IRBK-0108124
IRBK-0108124

# देवादिकांच्या — सणांच्या गोष्टी

लेखक : अमरेंद्र

वर्षांतील महत्त्वाच्या सणांची, जयंत्या इ. महत्त्वाच्या दिवसांची मूळ पुराणावरून लहान मुलांसाठीं लिहिलेली, एकेका पुस्तकांत एकेक संपूर्ण गोष्ट. • खूप चित्रें, जाड टाईप. • सोपी भाषा.

प्रत्येक पुस्तकाची किंमत ३५ नये पैसे

संच पहिला : रु. ४–२०

| | |
|---|---|
| १. गणपतीची गोष्ट | ७. होळीची गोष्ट |
| २. नवरात्राची गोष्ट | ८. गुढीपाडव्याची गोष्ट |
| ३. दिवाळीची गोष्ट | ९. अक्षय्यतृतीयेची गोष्ट |
| ४. दत्तगुरूंची गोष्ट | १०. वटसावित्रीची गोष्ट |
| ५. संक्रांतीची गोष्ट | ११. एकादशीची गोष्ट |
| ६. महाशिवरात्रीची गोष्ट | १२. नागपंचमीची गोष्ट |

संच दुसरा : रु. ४–६०

| | |
|---|---|
| १. रामनवमीची गोष्ट | ७. अनंतचतुर्दशीची गोष्ट |
| २. हनुमानजयंतीची गोष्ट | ८. कोजागिरीची गोष्ट |
| ३. नृसिंहजयंतीची गोष्ट | ९ वैकुंठचतुर्दशीची गोष्ट |
| ४. मंगळागौरीची गोष्ट | १०. त्रिपुरीपौर्णिमेची गोष्ट |
| ५. गोकुळाष्टमीची गोष्ट | ११. चंपाषष्ठीची गोष्ट |
| ६. वामनद्वादशीची गोष्ट | १२. रथसप्तमीची गोष्ट |

१३. दोन दत्तावतार : : किंमत ४० नये पैसे

- डायरेक्टर ऑफ एज्युकेशन यांच्याकडून शालेय ग्रंथालयांसाठीं शिफारस
- असिस्टंट क्यूरेटर ऑफ लायब्ररीज, महाराष्ट्र विभाग, यांच्याकडून सार्वजनिक वाचनालयांकरितां विशेष शिफारस.
- महाराष्ट्र लोकशिक्षण समितीकडून प्रौढ साक्षरांसाठीं मंजूर.
- शाळांतून सांस्कृतिक कार्यक्रमासाठीं अति उपयुक्त.

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २

गोष्टींचे

अगदीं लहान मुलांसाठी
सचित्र सुंदर पुस्तकें

संच पहिला : दोन रुपये

१. डोंगरावरील भाऊ :
'अलका' : ६० न.पै.

२. चांदोबाचा अंगरखा :
पां. शा. बावळे : ३५ न.पै.

३. जादूचा दिवा :
पां. शा. बावळे : ३५ न.पै.

४. जादूची शाल :
पां. शा. बावळे : ३५ न.पै.

५. रामाचें राज्य :
पां. शा. बावळे : ३५ न.पै.

संच दुसरा : दोन रुपये

६. ध्रुवाचें राज्य :
पां. शा. बावळे : ३५ न.पै.

७. हट्टी राजपुत्र :
पां. शा. बावळे : ३५ न.पै.

८. नागमणी :
इंदिरा देशपांडे : ६० न.पै.

९. सोन्याच्या केसाचा मुलगा :
'अलका' : ३५ न.पै.

१०. चॉकलेटचा डोंगर :
रा. ल. रेणावीकर : ३५ न.पै.

संच तिसरा : दोन रुपये

११. मी असा घडलों :
सुधाकर प्रभु : ६० न.पै.

१२. भोळें हरीण आणि
लबाड कोल्हा :
'अलका' : ३५ न.पै.

१३. घुडगुंचो :
भारती गाडगीळ : ३५ न.पै.

१४. पशूंची सहल :
रा. ल. रेणावीकर : ३५ न.पै.

१५. राजकन्या जलदा :
श्यामला जोशी : ३५ न.पै.



वोरा अँड कंपनी पब्लि. प्रा. लि. मुंबई

